**MHRG090006932019**

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | : २२/०८/२०१९ |
| नोंदणी दिनांक | : २२/०८/२०१९ |
| निकाल दिनांक | : ०९/०३/२०२६ |
| कालावधी | : वर्ष महिने दिवस<br>०६ ०६ १५ |

**फॉर्म नं.XXXII**

**भाग 'अ'**

**(न्यायनिर्णयाचे शिर्ष पान)**

**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४(i)]**

| | |
|---|---|
| **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा, जिल्हा–रायगड यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी : सं. वि. खैरे)**<br>न्यायनिर्णय घोषीत दि.०९/०३/२०२६<br>**नि. फौ. खटला क्र.४६/२०१९**<br>**निशाणी क्र. ४२** | |
| गुन्हा नोंद क्र.१७२/२०१८, रोहा पोलीस ठाणे | |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन,<br>रोहा पोलीस ठाणे.<br>ता. रोहा, जि. रायगड. |
| **अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ** | श्री. ए. एल. पवार,<br>विशेष सहा. सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी** | **सोमेश भालचंद्र धुमक**<br>वय – २८ वर्षे, व्यवसाय – मोलमजुरी,<br>रा. सुडकोली, पो. चणेरा,<br>ता. रोहा, जि. रायगड. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | श्री. पी. एच. पाटकर |

**भाग ब**

**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४(ii)अन्वये]**

| | |
|---|---|
| **गुन्हा घडल्याचा दिनांक** | २१/१२/२०१८ |
| **फिर्याद दाखल दिनांक** | २२/१२/२०१८ |
| **दोषारोप पत्र दाखल दिनांक** | २२/०८/२०१९ |
| **दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक** | २८/०७/२०२२ |
| **पुरावा सुरु झाल्याचा दिनांक** | ०२/०२/२०२३ |
| **न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक** | ०९/०३/२०२६ |
| **न्यायनिर्णय घोषित दिनांक** | ०९/०३/२०२६ |
| **शिक्षा दिली असल्यास ती दिनांक** | निरंक. |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं कलम ४२८ नुसार संपरीक्षे दरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | सोमेश भालचंद्र धुमक | अटक नाही. | – | भा.दं.सं.कलम ३२४ व ५०६ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## :: न्यायनिर्णय ::

(दिनांक ०९ मार्च, २०२६ रोजी घोषीत)

आरोपी याचेविरूध्द भारतीय दंड विधान १८६० (यापुढे सोयीकरीता संक्षिप्तरित्या भा.दं.वि. असे संबोधण्यात आले आहे.) कलम ३२४ व ५०६ या गुन्ह्यासंबंधी संपरीक्षा

चालविण्यात आली आहे.

**<u>अभियोग पक्षाची हकीकत संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणे आहे.</u>**

०२. फिर्यादी कौशल याच्या गावातील मुलांचा एकता मित्रमंडळ सुडकोली या नावाच्या व्हॉट्सअप ग्रुपवर त्याने किल्ले बिरवाडी येथील परिसराची साफसफाई करण्याबाबत चॅटींग केले असता आरोपीने त्याबाबत चेष्टा करुन भडकाऊ चॅटींग केले होते, परंतु फिर्यादी कौशल व ग्रुपमधील मुलांनी सदर बाबत चेष्टेचा विषय म्हणुन दुर्लक्ष केले होते. दि.२१.१२.२०१८ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता फिर्यादी कौशल हा त्याच्या युनिकेम कंपनीतील नोकरीवरुन येवुन गावातील दुर्गामाता मंदिराच्या गेटजवळ त्याने त्याची मोटरसायकल लावली व तो त्याचा मित्र मयुर याची वाट पाहत असताना मंदिराच्या पाय–याजवळ आरोपी व संकेत तेथे आले. आरोपीने फिर्यादी कौशल यास पाहुन 'तुझ्यात दम असेल तर ये, आता तुला व तुझ्या बापाला देखील मारण्याची ताकद माझ्यात आहे' असे बोलुन धमकावले. फिर्यादी कौशल याने आरोपीच्या जवळ जावुन त्याला समजावण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने त्याच्या हातात असलेला स्टीलचा कडा फिर्यादी कौशलच्या डोक्यात व गालावर डाव्या बाजुस तसेच नाकावर मारला. त्यामुळे त्याच्या डोक्यात व गालावर दुखापत झाली. आरोपीने फिर्यादी कौशलच्या पोटात फाईट मारली. त्यांचे भांडण संकेत सोडवत असताना त्यांचा आवाज ऐकुन तेथे फिर्यादी कौशलचे काका राजेंद्र आले व त्यांनी भांडण सोडविले. त्यावेळी आरोपीने फिर्यादी कौशल यास 'तु आता सुटलास, तु कंपनीतुन एकटा येतोस त्यावेळी तुला कधीपण खपवुन टाकीन' अशी धमकी दिली. फिर्यादी कौशल यास दुखापत झाल्यामुळे त्याचे काका राजेंद्र त्याला घेवुन घरी केले. त्यानंतर तो त्याचे काका व वडीलांसह रोहा पोलीस ठाणे येथे फिर्याद देण्यास गेले. परंतु पोलीसांनी त्याला वैद्यकीय उपचार घेण्यास सांगितल्यामुळे त्याने रोहा सरकारी दवाखान्यात जावुन उपचार घेतले व

आरोपीविरुध्द फिर्याद दिली. फिर्यादी कौशल याने दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीविरुद्ध रोहा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१७२/२०१८ वर भा.दं.वि.कलम ३२४ व ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल झाला.

०३. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने तपासी अधिकारी पो. हवा. व्ही. व्ही. फडतरे यांनी तपास केला. त्यांच्या तपासात आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्याच्याविरुद्ध या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले.

०४. माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी नि.क्र.०८ वर आरोपीविरुद्ध भा.दं.वि.कलम ३२४ व ५०६ या अपराधाकरीता दोषारोप ठेवला. आरोपीने गुन्हा कबुल केला नसल्यामुळे त्याच्या विरुद्ध खटला चालविण्यात आला. आरोपीस त्याच्याविरुध्द आलेल्या पुराव्यासंबंधी स्पष्टीकरण देण्याची संधी मिळावी म्हणुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम ३१३ अन्वये आरोपीचे नि.क्र.४० वर निवेदन नोंदविण्यात आले. आरोपीने अभियोगपक्षाचा संपुर्ण पुरावा नाकारला असुन पुर्वीच्या भांडणाच्या रागातुन फिर्यादी कौशल याने त्याच्याविरुध्द खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे.

०५. अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ श्री. ए. एल. पवार व आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. पी. एच. पाटकर यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाची हकीगत, त्यांनी अभिलेखावर आणलेला पुरावा विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होत आहेत. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढील प्रमाणे नोंदवीत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- |
| १. दि. २१.१२.२०१८ रोजी संध्याकाळी ०७.०० वाजणेच्या | |

| | | |
|---|---|---|
| | सुमारास मौजे सुडकोली, ता. रोहा, जि. रायगड येथे आरोपीने स्टीलचा कडा की ज्या शस्त्राने मारहाण केल्यास मृत्यू होण्याचा संभव आहे हे माहित असुनही अशा शस्त्राने फिर्यादी कौशल यास इच्छापूर्वक दुखापत पोहोचवुन भा. द. वि. कलम ३२४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | .. नाही |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी याने फिर्यादी कौशल यास फौजदारीपात्र धाकदपटशा करुन भा. द. वि. कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | .. नाही |
| ३. | काय आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक ०१ व ०२ करीता –

०६. मुद्दा क्र.०१ व ०२ एकमेकांशी संबंधित असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांची कारणमीमांसा एकत्रितपणे नोंदवित आहे.

०७. फिर्यादी कौशल (सा.क्र.०३) याने त्यांच्या गावातील मुलांच्या व्हॉट्‌असप ग्रुपवर दि.१८.१२.२०१८ रोजी किल्ले बिरवाडीची साफसफाई करण्याकरीता सहकार्य मिळावे या अनुषंगाने मॅसेज केला असता आरोपीने त्याची खिल्ली उडवली होती परंतु त्याने त्याकडे लक्ष दिले नव्हते असे कथन केले आहे. त्याने पुढे दि.२१.१२.२०१८ रोजी संध्याकाळी ०७.०० वाजेच्या सुमारास तो कामावरुन येवुन गावातील दुर्गामाता मंदिराजवळ त्याची गाडी लावुन मित्र मयुरची वाट पाहत असताना आरोपी व संकेत (सा.क्र.०४) तेथे आले व आरोपीने त्याला धमकी देवुन हातातील स्टीलच्या कडयाने त्याच्या डोक्यावर, नाकावर व डाव्या गालावर वार केले तसेच पोटात फाईट मारली की ज्यामुळे त्याचे नाक, डोके व डाव्या गालावर दुखापत झाली असे कथन

केले आहे. त्याने संकेत (सा.क्र.०४) हा भांडणे सोडविण्याचा प्रयत्न करत असताना आरोपी त्याचे ऐकत नव्हता व त्यांच्या भांडणाचा आवाज ऐकुन त्याचा काका राजेंद्र तेथे आला व त्याने भांडणे सोडविली असे कथन केले आहे. त्याने पुढे आरोपीने त्याला खपवुन टाकण्याची धमकी दिल्याचे देखील सांगितले आहे. त्याने त्याप्रमाणे नि.क्र.१९ वरील फिर्याद दिल्याचे तसेच वस्तु अ वरील कडा आरोपीने त्याला मारहाण करण्याकरीता वापरलेला कडा असल्याचे कथन केले आहे. त्याने त्याच्या उलटतपासात त्याची कामाची वेळ सकाळी ८.३० ते ०५.०० अशी असुन त्याला तिनही पाळयांमध्ये काम करावे लागते असे कथन केले आहे. त्याने पुढे उलटतपासात घटनास्थळावरील दुर्गामाता मंदिर गावातील अंतर्गत रस्त्यावर असुन आसपास लोकांची घरे असल्याचे मान्य केले आहे. त्याने त्याच्या घराजवळ मयुरचे घर असल्याचे व दि.२१.१२.२०१८ पुर्वीपासुन मयुर पेण येथे शिक्षण घेत असल्याचे व घटनेच्या दिवशी तो आला नसल्याचे मान्य केले आहे. त्याने त्याच्या जखमातुन रक्त येत असल्यामुळे त्या ठिकाणी लावलेला रुमाल तसेच त्याच्या अंगावरील रक्त पडलेले कपडे पोलीसांना दिले होते परंतु पोलीसांनी जमा करुन घेतले नाही असे सांगितले आहे. त्याने घटनेनंतर तो बेशुध्द झाल्यामुळे किती लोक जमा झाले होते हे त्याला आठवत नसल्याचे तसेच बेशुध्द झाल्याचा मजकुर फिर्याद देताना पोलीसांना सांगितला नसल्याचे कथन केले आहे. त्याने सदर घटना संध्याकाळी ०७.०० वाजता घडल्यानंतर फिर्याद रात्री १२.०० वाजता नोंदविण्यात आली व त्याकरीता झालेल्या विलंबाच्या अनुषंगाने स्पष्टीकरण त्याच्या फिर्यादीत नमुद नसल्याचे मान्य केले आहे.

०८. संकेत (सा.क्र.०४) यास घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणुन तपासण्यात आले आहे, परंतु त्याने सदर घटनेबाबत त्याला माहित नसल्याचे सांगितले आहे. विलास (सा.क्र.०१) व हशम (सा.क्र.०६) या दोघांना घटनास्थळाचा पंच साक्षीदार म्हणुन तपासण्यात आले आहे

परंतु त्यांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. अस्मित (सा.क्र.०२) यास आरोपीने गुन्हयात वापरलेला स्टीलचा कडा काढुन देण्याबाबत दिलेले निवेदन व त्याप्रमाणे त्याच्या घराच्या हॉलमधील कपाटामधुन स्टीलचा कडा जप्त करुन त्याप्रमाणे तयार केलेला पंचनामा सिध्द करण्यासाठी तपासण्यात आले आहे, परंतु त्याने देखील अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. राहुल (सा.क्र.०५) याने तीन – चार वर्षांपुर्वी तो केबलचे काम करत असताना पोलीसांनी त्याला पोलीस ठाण्यात बोलावले होते व त्याची एका फॉर्मवर सही घेतली आणि त्यानंतर पोलीसांनी त्याला व अस्मित (सा.क्र.०२) यास आरोपीसह मौजे सुडकोली येथे नेले व आरोपीने त्याच्या घरातील कपाटात ठेवलेले हातात घालायचे कडे दाखवले तसेच ते पोलीसांनी ताब्यात घेवुन त्याचे फोटो काढले असे कथन केले आहे. त्याने नि.क्र.२९ वरील आरोपीच्या निवेदनावर तसेच नि.क्र.३० वरील निवेदन पंचनाम्यावर त्याची सही असल्याचे मान्य केले आहे, परंतु त्यातील मजकुराविषयी त्याला आठवत नसल्याचे सांगितले आहे. त्याने पुढे आरोपीने गुन्हयात वापरलेले कडे त्याच्या घरी ठेवल्याचे सांगितल्याचे व त्या अनुषंगाने पोलीसांनी त्याचे निवेदन लिहुन घेवुन त्याप्रमाणे आरोपीच्या घरातील कपाटातुन स्टीलचे कडे जप्त केल्याचे कथन केले आहे. त्याने वस्तु अ वरील कडा तोच असल्याचे देखील सांगितले आहे. त्याने त्याच्या उलटतपासात सुडकोली येथे जाण्याकरीता वापरलेले वाहन शासकीय होते की खाजगी तसेच त्याचा नोंदणी क्रमांक काय होता ते तो सांगु शकत नसल्याचे मान्य केले आहे. त्याने घरातील कोणत्या खोलीमधुन व कोणत्या कपाटातुन कडे काढण्यात आले त्याची खात्री स्वतः केली नसल्याचे देखील मान्य केले आहे. त्याने रोहा शहरापासुन सुडकोली गाव २२ कि.मी. असल्याचे मान्य केले आहे.

०९. तपासी अधिकारी पो. हवा. फडतरे (सा.क्र.०७) याने त्याच्या तपासात आरोपीने

गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे दोषारोपपत्र दाखल केल्याचे कथन केले आहे. त्याने त्याच्या उलटतपासात सुडकोली गाव रोहा शहरापासुन अंदाजे २१ कि.मी. अंतरावर असुन तेथे जाण्यासाठी पाऊण तास लागतो असे मान्य केले आहे. त्याने फिर्याद देण्यास झालेल्या विलंबाचे कारण फिर्यादीत नसल्याचे मान्य केले आहे.

१०. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी कौशल (सा.क्र.०३) व आरोपी यांच्यामध्ये घटनेच्या पुर्वी व्हॉट्सअप ग्रुपमधील चॅटींग वरुन वाद झाल्याचे दिसत आहे. फिर्यादी कौशल (सा.क्र.०३) याने घटनेच्या दिवशी तो कामावरुन गावात परत आल्यानंतर त्याचा मित्र मयुर याची वाट पाहात तो घटनास्थळी थांबला होता असे कथन केले आहे. परंतु त्याने त्याच्या उलटतपासात घटनेच्या पुर्वीपासुन मयुर पेण येथे शिक्षण घेत होता तसेच त्या दिवशी तो आला नव्हता असे सांगितल्यामुळे गावात उपस्थित नसणा-या मयुरची वाट फिर्यादी कौशल (सा.क्र.०३) पाहत होता हे त्याचे कथन विश्वासार्ह वाटत नाही. त्याने त्याच्या नोकरीची वेळ सकाळी ०८.३० ते संध्याकाळी ०५.०० अशी सांगितली आहे. त्याने जरी त्याला तीन पाळयांमध्ये काम करावे लागत असल्याचे कथन केले असले तरी त्याच्या पुराव्यात त्या दिवशी तो सकाळी ०७.३० वाजता नोकरीवर गेला होता असे दिसत असल्यामुळे निश्चितपणे तो संध्याकाळी ०५.०० वाजता त्याच्या कामावरुन सुटला असेल असे असतानाही संध्याकाळी ०७.०० वाजता एवढया उशीराने तो नोकरीवरुन सरळ मंदिराजवळ आला हे त्याचे कथन देखील विश्वासार्ह वाटत नाही.

११. घटनेवेळी हजर असणारा संकेत (सा.क्र.०४) याने देखील त्याला घटनेसंबंधी माहित नसल्याचे कथन केल्यामुळे सदर घटनेच्या सत्यतेविषयी शंका उपस्थित होत आहे. अभियोगपक्षास राजेंद्र हा मयत झाल्यामुळे त्यास तपासता आले नाही परंतु फिर्यादी कौशल (सा.क्र.०३) याने मान्य केल्याप्रमाणे घटनास्थळाच्या आजुबाजुस इतर बरीच घरे असतानाही

अन्य स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अभियोगपक्षामार्फत तपासण्यात आला नाही.

१२. अभियोगपक्षाने त्यांची भिस्त नि.क्र. २९ वरील आरोपीच्या निवेदनावर तसेच त्या अनुषंगाने जप्त केलेल्या वस्तु अ वरील स्टीलच्या कडयाच्या नि.क्र.३० वरील जप्ती पंचनाम्यावर ठेवली आहे. त्याबाबत राहुल (सा.क्र.०५) याने सदर निवेदन व पंचनामा त्याचे समक्ष झाल्याचे कथन केले आहे. परंतु उलटतपासात त्याने सही केलेला फॉर्म म्हणजे निवेदन किंवा पंचनामा वाचुन बघितला नव्हता किंवा त्यातील मजकुराची खात्री केली नव्हती असे मान्य केले आहे. त्याने सदर कडा घरातील कोणत्या खोलीतील कोणत्या कपाटातुन जप्त केला याबाबत त्याने स्वतः खात्री केली नसल्याचे मान्य केल्यामुळे सदर पंचनामा देखील त्याच्या समक्ष झाला किंवा कसे याबाबत शंका उपस्थित होत आहे. थोडयावेळाकरीता आरोपीने जरी वस्तु अ वरील कडा काढुन दिल्याचे मान्य केले असले तरी त्या कडयाने आरोपीने फिर्यादी कौशल (सा.क्र.०३) यास मारहाण केल्याबाबतचा पुरावा संशयास्पद व अपर्याप्त असल्यामुळे आरोपीचे निवेदन किंवा जप्ती पंचनाम्याआधारे आरोपीस दोषी ठरविता येणार नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे अभियोगपक्षाने फिर्यादी कौशल (सा.क्र.०३) यास झालेल्या दुखापतींचा कोणताही वैद्यकीय पुरावा दिला नाही. फिर्यादी कौशल (सा.क्र.०३) याने रक्ताने भरलेला रुमाल व अंगावरील कपडे पोलीसांना देत असताना पोलीसांनी ते जमा करुन घेतले नाही असे सांगितले आहे. सदर रुमाल किंवा कपडे सबळ पुरावा असतानाही तपासी यंत्रणेकडुन जमा करुन घेतला न जाणे हे देखील स्वाभाविक वाटत नाही.

१३. प्रस्तुत घटना संध्याकाळी ०७.०० वाजता घडल्याचे अभियोगपक्षाचे कथन असतानाही सदर घटनेची फिर्याद रात्री १२.२१ वाजता नोंदविली जाणे व सदर विलंबाचे कोणतेही स्पष्टीकरण अभिलेखावर न येणे ही बाब देखील फिर्याद विचाराअंती दिली जाण्याची

शक्यता स्विकारण्यास भाग पाडत आहे.

१४.　　अशा प्रकारे अभियोग पक्षाचा पुरावा आरोपीस दोषी ठरविण्याइतपत पर्याप्त नाही. सबब, अभियोग पक्ष आरोपींविरुद्ध गुन्हा शाबीत करण्यास अपयशी ठरला असल्याने मी मुद्दा क्र.०१ व ०२ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवीत आहे.

## मुद्दा क्रमांक ०३ करीता –

१५.　　वरील चर्चेवरुन स्पष्ट होते की, भा.दं.वि.कलम ३२४ व ५०६ या अपराधांच्या सिद्धतेकरीता आवश्यक असणा–या घटकांची परिपुर्ती अभियोग पक्षास करता आली नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. जप्त मुद्देमाल वस्तु अ वरील स्टीलचा कडा शासकीय लिलावाद्वारे विक्री करुन त्यातुन येणारी रक्कम शासन जमा करणे न्यायोचित ठरेल. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.०३ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. आरोपी **सोमेश भालचंद्र धुमक** यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान १८६० कलम ३२४ व ५०६ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

०२. आरोपीने पुर्वी सादर केलेले वैयक्तीक व जामीनदाराचे बंधपत्र रद्द करुन जामीनदारांना बंधपत्रातून मुक्त करण्यात येत आहे.

०३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ चे पुर्ततेकरीता रक्कम रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र ठेवढ्याच रक्कमेच्या लायक जामीनासहीत सादर करावे.

०४. जप्त मुद्देमाल स्टीलचा कडा शासकीय लिलावाद्वारे विक्री करुन त्यातुन येणारी रक्कम शासन जमा करण्यात यावी.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत..

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.03.10 11:34:40 +0530

स्थळ : रोहा. (सं. वि. खैरे)

दिनांकः ०९.०३.२०२६ न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

**भाग क**

**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४(iii) अन्वये]**

**अभियोग पक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ.अभियोग पक्ष :-**

| अ.क्र | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१. | विलास हरिश्चंद्र फोडकर | घटनास्थळ पंच | ११ |
| ०२. | अस्मित गजानन रणदिवे | निवेदन व जप्ती पंच | १७ |
| ०३. | कौशल भालचंद्र ढऊळकर | फिर्यादी | १८ |
| ०४. | संकेत विलास गवाळे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | २७ |
| ०५. | राहुल मनोहर खराडे | निवेदन व जप्ती पंच | २८ |
| ०६. | हशम ईस्माईल हळदे | घटनास्थळ पंच | ३४ |
| ०७. | पो. हवा. व्ही. व्ही. फडतरे | तपासी अधिकारी | ३६ |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :-**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक. | निरंक. |

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास :-**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक. | निरंक. |

**अभियोग पक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी**

**अ.अभियोग पक्ष :-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | सा.क्र.०३/१९ | फिर्याद |

| | | |
|---|---|---|
| ०२. | सा.क्र.०५/२९ | निवेदन पंचनामा |
| ०३. | सा.क्र.०५/३० | जप्ती पंचनामा |
| ०४. | सा.क्र.०७/३७ | घटनास्थळ पंचनामा |

**ब. बचाव पक्ष :-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | स्वरूप |
|---|---|---|
| ०१. | निरंक. | निरंक. |

**क. न्यायालयीन निशाणी :-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | स्वरूप |
|---|---|---|
| ०१. | निरंक. | निरंक. |

**ड. भौतिक वस्तू :–**

| अ.क्र. | भौतिक वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | अ | स्टीलचा कडा |

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.03.10 11:34:48 +0530

स्थळ : रोहा. (सं. वि. खैरे)

दिनांकः ०९.०३.२०२६ न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same word to word as per the original Judgment or Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | :- | Shri. A. A. Nakhawa,<br>Stenographer Grade -III. |
| Name of the Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C. Roha, |
| Judgment / Order dictated on | :- | 09/03/2026 |
| Judgment / Order delivered on | :- | 09/03/2026 |
| Judgment / Order signed on | :- | 10/03/2026 |
| Judgment / Order uploaded on | :- | 10/03/2026 |